सोमवार दि.12-02-2024

# क्रिएटिव्ह परफॉर्मन्स विजेता पुरस्काराने देवचंद कॉलेज सन्मानित




निपाणी (प्रतिनिधी) : दि. १० फेब्रुवारी २०२४ रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या क्विक हिल फाउंडेशन मार्फत सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवार्ड २०२४ चा अवार्ड देवचंद महाविद्यालय अर्जुननगर ला देऊन सन्मानित करण्यात आले.देवचंद कॉलेज अर्जुननगर येथील संगणकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने सायबर सुरक्षा जागरूकता महिन्याचे औचित्यसाधून 'सायबर सुरक्षा व जागरूकता' या विषयावर 'कमवा आणि शिका' योजने अंतर्गत प्रशिक्षण घेण्यात आले होते. ५० विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणात भाग घेतला होता. निपाणी व परिसरातील १०,००० विद्यार्थ्यांचे देवचंद कॉलेजच्या सायबर वारियरकडून सायबर जागरूकतेतुन प्रबोधन केले.

याची दखल घेऊन क्विक हिल फाऊंडेशन ने कॉलेजमधील १० विद्यार्थी, १ शिक्षक आणि देवचंद कॉलेजला नॉमिनेशन होते. त्यापैकी समृद्धी भराडे आणि शितल शिरगावे या दोन विद्यार्थिनींना बेस्ट प्रोसेस कंप्लायंस अवार्ड, तर प्रा. प्रशांत कुंभार यांना एक्स्ट्रा माईल रिकग्नेशन अवार्ड तर देवचंद कॉलेज अर्जुननगरला क्रिएटिव्ह परफॉर्मन्स अवार्ड मिळाला.हा सन्मान स्वीकारताना महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. डॉ. जी. डी. इंगळे, प्रा. प्रशांत कुंभार, क्विक हिल फौंडेशन च्या सी.ओ. ई. मा. अनुपमा काटकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष श्रीमान आशिषभाई शाह व उपाध्यक्षा डॉ.सौ. तृप्तीभाभी शाह, महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो.डॉ. जी. डी. इंगळे व उपप्राचार्य प्रो. डॉ. पी. पी. शाह याचे मार्गदर्शन लाभले.

[redacted]